नागपूर महसूल विभागातील २ क्षेत्रिय अधिकाऱ्यांना जुन्या निर्लेखित वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदी करण्यास मंजुरी देणेबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः जेपीएस-२०१६/प्र.क्र.१७३/ई-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: ०९ नोव्हेंबर, २०१७.

संदर्भ:-

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. जेपीएस-२०१३/प्र. क्र. ३१४/ई-८, दि. २१ एप्रिल, २०१६.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-वाहन-२०१६/प्र.क्र.५१/१६/विनियम, दि. २१/०१/२०१७.
३) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.साप्रशा/कार्या-सि(१०)/
काविं-२२३/१७, दि.१५/०६/२०१७
४) जिल्हाधिकारी, वर्धा यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष ब /लेखा/कावी ३१८१/२०१७, दि.०५/०६/२०१७.

प्रस्तावना:-

नागपूर महसूली विभागातील लेखाशिर्ष “२०५३-जिल्हा प्रशासन" या खाली वेतन आहरीत करणा-या एकूण ११६ क्षेत्रिय अधिका-यांना शासकीय वाहनांची अनुज्ञेयता संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णय दि. २१ एप्रिल, २०१६ अन्वये शासनाने मंजूर केली आहे. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर व जिल्हाधिकारी, वर्धा यांनी अनुक्रमे त्यांच्या संदर्भाधीन क्र.३ व ४ येथील पत्रांन्वये त्यांच्या कार्यालयातील १) उप विभागीय अधिकारी, नागपूर (शहर) व २) अपर जिल्हाधिकारी, वर्धा या अधिका-यांना निर्लेखित केलेल्या वाहनांच्या बदली नवीन वाहन खरेदीस मंजूरी देण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:-

नागपूर महसूली विभागातील या शासन निर्णयासोबतच्या सहपत्र -अ॰ मध्ये नमूद १) अपर जिल्हाधिकारी, वर्धा व २) उप विभागीय अधिकारी, नागपूर (शहर) या २ क्षेत्रिय अधिकाऱ्यांना त्यांच्या पूर्वीच्या जुन्या निर्लेखित वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदी करण्यास व तदप्रित्यर्थ येणा-या प्रत्येकी रु. ६.०० लाख याप्रमाणे एकूण रु.१२.०० लक्ष (रुपये बारा लाख फक्त) च्या खर्चास खालील अटींच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे:-

१) अर्थसंकल्पीय निधीच्या ७० % च्या मर्यादेत खर्च सिमित ठेवण्यात यावा.

२) राज्यस्तरीय वाहन आढावा समितीने मान्यता दिल्यानुसार अनुज्ञेय नवीन वाहन विहित कार्यपद्धतीस अनुसरुन खरेदी करण्यात यावे.

३) वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक २ येथील दिनांक २१/०१/२०१७ च्या शासन निर्णयान्वये "सहपत्र -अ" मधील अधिका-यांसाठी प्रत्येकी रु.६.०० लाखांच्या किंमतीच्या मर्यादेतच वाहनांची खरेदी करण्यात यावी. वाहन खरेदीसाठी मंजूर केलेल्या अनुदानामध्ये वाहनाच्या किंमतीमध्ये सर्व करांचा समावेश आहे.

४) नवीन वाहन ज्या अधिकाऱ्यास मंजूर करण्यात आले आहे, त्या अधिकाऱ्यांनी सदर वाहनाचा वापर उक्त कार्यालयाच्या शासकीय कामकाजासाठी करावा.

५) नवीन वाहन खरेदी केल्यानंतर त्यासंबंधी अनुपालन अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

२. प्रस्तुत शासन निर्णयासोबतच्या सहपत्रातील अनु.क्र. १ व २ साठी येणारा खर्च अनुक्रमे "मागणी क्र. सी-१, २०५३- जिल्हा प्रशासन (००) ०९३ जिल्हा आस्थापना (०१) सर्व साधारण आस्थापना (०१) **(०५)** आयुक्त, नागपूर (२०५३ ०१०८) बाब क्र.१३- कार्यालयीन खर्च व **"**मागणी क्र. सी-१**,** २०५३- जिल्हा प्रशासन (००) ०९४ इतर आस्थापना (०१) उप विभागीय आस्थापना (०१)(०५) आयुक्त**,** नागपूर (२०५३ ०२०६) १३ - कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षाखाली मंजूर अर्थसंकल्पिय तरतुदीतून भागविण्यास शासन मंजुरी देत आहे.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ.सं.क्र.४४८/२०१७/विनियम, दिनांक २५/१०/२०१७ अन्वये दिलेल्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७११०६१११९४०७९१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Nilkanth Pandurang Awhad

Digitally signed by Nilkanth Pandurang Awhad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e42a88b7548c3a7d48b7a77d85de3524cf8f2e7e0f87091223ad803d4d4a2a31, cn=Nilkanth Pandurang Awhad
Date: 2017.11.09 13:04:02 +05'30'

(नि. पां. आव्हाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
जिल्हाधिकारी, वर्धा.
अपर जिल्हाधिकारी, वर्धा, जि. वर्धा
उपविभागीय अधिकारी, नागपूर (शहर), जि. नागपूर.

प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा) -२, महाराष्ट्र, नागपूर.
जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर/वर्धा.
उप सचिव, वित्त विभाग (विनियम), मंत्रालय, मुंबई-३२.
निवड नस्ती, कार्यासन ई-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.

“सहपत्र -अ”

नागपूर महसूल क्षेत्रिय स्तरावरील अधिका-यांच्या वापरातील निर्लेखित वाहनांचे विवरणपत्र

(शासन निर्णय क्रमांक - जेपीएस-२०१६/प्र.क्र.१७३/ई-८, दिनांक ०९ नोव्हेंबर, २०१७ सोबतचे विवरणपत्र)

अ.क्र.	जिल्हा	वाहन वापरणा-या अधिका-यांचे पदनाम	निर्लेखित वाहनाचा क्रमांक
१	वर्धा	अपर जिल्हाधिकारी, वर्धा	एम एच ३२ जे ७७७७
२	नागपूर	उप विभागीय अधिकारी, नागपूर (शहर)	एम एच ३२ जी ९४५९